मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मालमत्ता कर वसुलीसाठी अधिकारी 'ऑन ग्राउंड'!

## करवसुली मोहीम : 5 लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या 14 मालमत्ता जप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मालमत्ता कर वसुलीसाठी धडक मोहीम हाती घेतली आहे. महानगरपालिका प्रशासनाने आता थकबाकीदारांच्या पाच लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात केली आहे. ही जप्ती मोहिमेमध्ये महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारीही सहभागी होत आहेत.

करवसुलीसाठी गुरुवारी (20 मार्च) अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी थेट महानगरपालिका कार्यक्षेत्रात चिखली, तळवडे, आकुर्डी, वाकड झोनमधील मिश्र, बिगनिवासी, व्यावसायिक थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त केल्या असून निवासी मालमत्ता कर थकबाकीदारांच्या मालमत्तांचे नळ कनेक्शन तोडणीची कारवाई करण्यात आली.




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन व आकारणी विभागामार्फत मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांना सातत्याने आवाहन करण्यात आहे. वारंवार आवाहन करून देखील जे मालमत्ताधारक मालमत्ता कर भरत नाहीत, त्यांना नोटीस देण्यात येत आहेत. त्यानंतरही कर न भरणाऱ्या थकबाकीदारांच्या आता थेट मालमत्ता जप्त करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठी मालमत्ता कर विभागाची प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयात पथके कार्यरत करण्यात आली आहे. त्यातच आता आर्थिक वर्ष 2023-24 संपण्यासाठी अवघे बारा दिवस शिल्लक राहिल्यामुळे आता थेट जप्ती कारवाई करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी ऑन ग्राऊंड दिसू लागले आहेत.

गुरुवारी चिखली येथील श्संदीप प्रकाश मोरे यांच्या मिश्र मालमत्तेकडे 23 लाख 49 हजार 508 लाख रुपयांची थकबाकी असल्याने मालमत्ता जप्तीची व नळ कनेक्शन तोडणीची कारवाई करण्यात आली. त्याचबरोबर, तळवडे येथील भालेकर नवनाथ तुकाराम व इतर यांच्या इंडिया टूल्स या औद्योगिक मालमत्तेकडील 20 लाख 64 हजार रुपयांच्या थकीत रकमेपोटी मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली. याचबरोबर, बेळळे माधव नागप्पा यांच्या मिश्र मालमत्तेकडील 16 लाख 93 हजार 597 इतक्या रक्कमपोटी, आकुर्डी येथील मे. हॉटेल पन्हाळगड तर्फे विवेक सोपान काळभोर/गोपाळ धों. काळभोर व इतर 2 यांच्याकडील 28 लाख 37 हजार 203 इतक्या थकीत रकमेपोटी,हॉटेल शेतकरी मळा तर्फे अनिकेत भगवान काळभोर यांच्या 23 लाख 38 हजार 522 इतक्या थकीत रकमेपोटी,मे. हॉटेल कबाबकरी तर्फे ओंकार अरुण काळभोर यांच्या 10 लाख 75 हजार 404 इतक्या थकीत रकमेपोटी तर मे. शेतकरी मळा मिसळ हाऊस तर्फे अजिंक्य भगवान काळभोर यांच्या 1 लाख 89 हजार 846 इतक्या थकीत रकमेपोटी तर वाकड येथील धनाजी रामभाऊ विनोदे यांचे हॉटेल अजिंक्य यांच्याकडील 14 लाख 44 हजार 902 इतक्या थकीत रकमेपोटी मालमत्ता जप्तीची कारवाई करून मालमत्ता सील करण्यात आल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त, सहाय्यक आयुक्त, प्रशासन अधिकारी, सहाय्यक मंडलाधिकारी, गटप्रमुख आदींच्या उपस्थितीत सदर कारवाई करण्यात आली.

### 862 कोटींची झाली वसुली

» आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने आतापर्यंत 862 कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे बारा दिवस शिल्लक राहिले असून त्या अनुषंगाने कर वसुलीची मोहीम अधिकच व्यापक स्वरुपात राबवली जात आहे. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी साप्ताहिक सुट्टी (शनिवार, रविवार) आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कर संकलन कार्यालय सुरू राहणार आहे.

# वयाच्या अवघ्या 23 व्या वर्षी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंटपदी निवड

## पिंपळे गुरवच्या चिंतामण बुरसे यांचे यश : महापालिकेत अतिरिक्त आयुक्तांच्या हस्ते सन्मान

**पिंपरी | प्रतिनिधी**

देशसेवेसाठी लहानपणापासून भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगत वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड झालेल्या पिंपळे गुरव येथील चिंतामण विष्णू बुरसे यांचा महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पिंपरी चिंचवड शहरातील देशसेवेत सहभागी होणा-या युवकांमुळे शहराच्या लौकिकात



भर पडली असून अशा युवकांचा अभिमान वाटत असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, चिंतामण बुरसे यांचे वडील विष्णू बुरसे,आई स्वाती बुरसे, विद्युत विभागातील प्रशांत जोशी हे उपस्थित होते.

चिंतामणला आठवीत असल्यापासून भारतीय सैन्याचे पोस्टर्स पाहून भारतीय सैन्यात भरती होण्याची आवड निर्माण झाली. तेच ध्येय मनाशी बांधून त्याने सैन्यात भारती होण्याचे सातत्याने प्रयत्न केले. एनडीए येथे निवड होण्यासाठी तीन वेळेस लेखी परीक्षा दिली परंतु मुलाखतीमध्ये निवड झाली नाही अशा परिस्थितीतून स्वत:चा आत्मविश्वास ढळू न देता चिंतामणने पुन्हा जोमाने अभ्यास करत एनसीसी कोट्यातून परीक्षा दिली. त्यामध्ये त्याची लेफ्टनंट पदी निवड झाली.

चेन्नई येथे ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी येथे त्यांनी तीन महिन्यांचे खडतर प्रशिक्षण देखील पूर्ण केले आहे. लवकरच ते ग्वाल्हेर येथे भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट म्हणून ते रुजू होणार आहे.

# मेट्रोच्या नवीन मार्गिकांवरील स्थानके अत्याधुनिक

## शहरातील मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांना गती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्पांना गती देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू केली आहे. प्रकल्पातील खराडी ते खडकवासला आणि नळ स्टॉप ते माणिकबाग या मेट्रो मार्गावरील स्थानकांसाठी 'रचनाकार सल्लागार समिती'साठी खासगी कंपन्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) निविदा मागविण्यास सुरुवात केली आहे.



सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील पहिल्या टप्प्यातील मार्गांचा विस्तार अंतिम टप्प्यात असताना दुसऱ्या टप्प्यातील पाच मार्ग नव्याने प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यापैकी खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी या २५.५१ किलोमीटर अंतराच्या मार्गावर २२ स्थानके आहेत, तर नळ स्टॉप ते वारजे-माणिकबाग ६.१२ किलोमीटर मार्गावर सहा स्थानके निश्चित करण्यात आली आहेत. या दोन्ही मार्गांवरील स्थानकांची रचना भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून आणि इतर दळणवळण यंत्रणा परिस्थितीनुरूप सुनिश्चित करण्यासाठी 'मेट्रो'ने खासगी रचनाकार सल्लागार समितीची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविल्या आहेत.

**खडकवासला-खराडी मार्ग (२५.५१ किलोमीटर २२ स्थानके)**

खडकवासला, दळवेवाडी, नांदेड सिटी, धायरी फाटा, माणिकबाग, हिंगणे चौक, राजाराम पूल, देशपांडे उद्यान, स्वारगेट (उत्तर), सेव्हन लव्हज चौक, पुणे कटक मंडळ, रेसकोर्स, फातिमानगर, रामटेकडी, हडपसर फाटा, मगरपट्टा (दक्षिण), मगरपट्टा मध्य, मगरपट्टा (उत्तर), हडपसर रेल्वे स्थानक, साईनाथनगर, खराडी चौक आणि खराडी बायपास अशी २२ स्थानके निश्चित करण्यात आली आहेत.

**नळ स्टॉप ते वारजे माणिकबाग (६.१२ कि.मी. ६ स्थानके)**

माणिकबाग, दौलतनगर, वारजे, डहाणूकर कॉलनी, कर्वे पुतळा आणि नळ स्टॉप ही सहा स्थानके आहेत.

> मेट्रो मार्गांच्या प्रभावक्षेत्र भागातील स्थानकांचे सुरळीत नियोजन सुनिश्चित करण्यासाठी पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याशी महामेट्रो समन्वय साधणार आहे. स्थानकांवरील सुविधांच्या अनुषंगाने कलात्मक आणि सुलभ रचनेसाठी लवकर निविदा प्रक्रिया राबवून आराखडा करण्याचे काम हाती घेण्यात येईल.
>
> **- श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो.**

### स्थानकांमधील रचना

» **परिसरानुसार स्थानकाची रचना, प्रवाशांना सहज आणि सुलभ प्रवास करण्यासाठी सुविधा, वातानुकूलित यंत्रणा, स्थानकावरील विद्युत आणि सौर यंत्रणांची सुविधा, अग्निसुरक्षेपासून हरित इमारतीच्या दृष्टीने नैसर्गिक स्रोतांचा पुरेपूर वापर, स्वच्छतागृहे, उपाहारगृहे, वस्तू विक्री दुकाने, ध्वनियंत्रणा आणि इतर मानकांनुसार देखभाल दुरुस्ती आदींचा विचार करून अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित कंपनीची नियुक्ती असणार आहे.**

# बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय खुले होण्यासाठी आणखी प्रतीक्षा

## बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय नूतनीकरण आणि सुशोभीकरणासाठी नऊ वर्षांपासून बंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड येथील बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालय नूतनीकरण आणि सुशोभीकरणासाठी नऊ वर्षांपासून बंद असून, आतापर्यंत २० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. आता तिसऱ्या टप्प्यातील कामे हाती घेण्यात आल्याने आणखी सव्वा वर्ष हे संग्रहालय खुले होण्यासाठी पर्यटकांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना पशु-पक्ष्यांची माहिती व्हावी, या उद्देशाने महापालिकेने चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये 'एमआयडीसी'च्या सात एकर जागेत १९८९ मध्ये बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान आणि प्राणी संग्रहालय उभारले. या संग्रहालयाच्या नूतनीकरणासाठी मे २०१६ ला सुरुवात झाली. तेव्हापासून संग्रहालयाला टाळे आहे. प्राणी संग्रहालयासाठी केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सर्पोद्यान व प्राणी संग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. संग्रहालयावर आतापर्यंत दोन टप्प्यांत २० कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. नऊ वर्षे होऊनही प्राणिसंग्रहालयाच्या सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले नसून संग्रहालयास टाळे आहे.

या कामात गैरव्यवहार झाल्याचा आणि अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे ३६ प्राणी, पक्ष्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप विधिमंडळाच्या अधिवेशनात करण्यात आला होता. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सुशोभीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर प्राणिसंग्रहालय महाराष्ट्र वनविकास महामंडळाकडे (एफडीसीएम) हस्तांतरित करण्याचा आदेश तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिला.




महामंडळाने महापालिका प्रशासनाला पत्र पाठवून केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या नियमानुसार या प्राणिसंग्रहालयाचे काम लवकरात लवकर सुरू करून ते पूर्ण करावे, पर्यटन वाढण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, त्याप्रमाणे सेवा-सुविधा निर्माण करावी, अशा सूचना केल्या. त्यामुळे महापालिकेने जुनी निविदा रद्द केली. संग्रहालयासाठी एक तज्ज्ञ अधिकारी नियुक्त करण्यात आला होता. त्यानंतर सल्लागार बदलण्यात आला. आराखड्यात बदल आणि सुधारणा करून फेरनिविदा प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये पात्र ठरलेल्या ठेकेदाराला तिसऱ्या टप्प्यातील काम देण्यात आले आहे. यासाठी २४ कोटी दोन लाख १६ हजार ६८ रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या खर्चाला आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या नियमानुसार आणि प्राणीतज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार संग्रहालयाचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. तिसऱ्या टप्प्यातील संग्रहालयाचे काम १५ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तोपर्यंत संग्रहालय बंदच राहणार असल्याचे स्थापत्य उद्यान विभागाचे सहशहर अभियंता मनोज सेठिया यांनी सांगितले.

# संत मदर तेरेसा पुलावर उभारला आणखी एक रॅम्प

## पुलावर जाण्यासाठी रॅम्प उभारण्यात आला आहे,त्यामुळे चिंचवडमधील वाहन चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

संत मदर तेरेसा हा ऑटो क्लस्टर ते काळेवाडी दरम्यान उभारला आहे. हा पूल चिंचवडमधून जातो. मात्र चिंचवडकर नागकरिकांना त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. अखेर या पुलावर जाण्यासाठी रॅम्प उभारण्यात आला आहे. त्यामुळे चिंचवडमधील वाहन चालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. लवकरच हा रॅम्प वाहन चालकांसाठी खुला करण्यात येणार आहे.

ऑटो क्लस्टर, चिंचवड ते काळेवाडी दरम्यान संत मदर तेरेसा पूल उभारण्यात आला आहे. हा पुल पिंपरी चिंचवड लिंक रस्त्यावरून जातो. मात्र चिंचवडकरांना त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. जर या पुलाला जोडण्यासाठी रॅम्प तयार केला तर चिंचवडमधील वाहन चालकांना याचा मोठा उपयोग होऊ शकतो, हे जाणून माजी नगरसेवक राजेंद्र गावडे यांनी रॅम्पबाबत २०१८ मध्ये महापालिकेकडे प्रस्ताव सादर केला. मात्र विकास आराखड्यात येथील जागा नसल्याने येथील जागा मालक श्रीकांत गावडे, उत्तम गावडे, मुकुंद गावडे, राकेश गावडे, राजेश गावडेआणि तोताराम सुखवानी यांना रम्पचे महत्व समजून सागितले. टीडीआरच्या बदल्यात त्यांनी जागा दिल्या.

महापालिकेने १५ कोटी ८९ लाख रुपयांची निविदा मंजूर केली. १७ ऑगस्ट २०२१ रोजी वर्क ऑर्डर दिली. मात्र पाटबंधारे विभागाची एनओसी येण्यासाठी वेळ लागला. सध्या चिंचवडमधून ऑटो क्लस्टरकडे जाणारा रॅम्प तयार झाला आहे. तसेच चिंचवडमधून काळेवाडीकडे जाणाऱ्या रॅम्पचे काम महिनाभरात पूर्ण होणार आहे. त्यानंतर हा रॅम्प वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.

चिंचवड स्टेशन कडून चिंचवड गावाकडे येणारा रेल्वे उड्डाणपूल पाडून नवीन पूल उभारण्यात येणार असल्याचे महापालिकेने जाहीर केले आहे. पिंपरी चिंचवड लिंक रोडवर संत मदर तेरेसा पुलावर उभारण्यात आलेला रॅम्प हा पिंपरी आणि चिंचवड स्टेशन येथील उड्डाण पुलाला पर्याय ठरणार आहे. सध्या चिंचवडमधून ऑटो क्लस्टरकडे जाणारा रॅम्प तयार झाला आहे. तसेच चिंचवडमधून काळेवाडीकडे जाणाऱ्या रॅम्पचे काम महिनाभरात पूर्ण होणार आहे. त्यानंतर हा रॅम्प वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.



### पिंपरी आणि चिंचवड उड्डाण पुलाला पर्याय

» सध्या जुन्या पुणे मुंबई महामार्गावर जाण्यासाठी चिंचवड स्टेशन आणि पिंपरी उड्डाणपूल हे दोन पर्यायआहेत. लवकरच चिंचवड स्टेशन कडून चिंचवड गावाकडे येणारा रेल्वे उड्डाणपूल पाडून नवीन पूल उभारण्यात येणार असल्याचे महापालिकेने जाहीर केले आहे. पिंपरी चिंचवड लिंक रोडवर संत मदर तेरेसा पुलावर उभारण्यात आलेला रॅम्प हा पिंपरी आणि चिंचवड स्टेशन येथील उड्डाण पुलाला पर्याय ठरणार आहे.

### जागेअभावी अडलाय 'तो' रस्ता

» काळेवाडी ते चिंचवडगाव दरम्यान चिंचवड विद्युत समशानभूमी पासून ते पिंपरी चिंचवड लिंक रोडवर जाण्यासाठी पर्यायी रस्त तयार केला आहे. मात्र दोन ठिकाणी जागा मालकांनी जागा ताब्यात दिलेल्या नाहीत. मात्र इतर भागात रस्ता तयार झाला आहे. जर या जागा ताब्यात आल्यास केशवनगर, तानाजी नगर येथील नागरिकांना पुणे मुंबई रस्त्यावर येणाऱ्या वाहन चालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> संत मदर तेरेसा उड्डाणपूल हा चिंचवडमधून जात होता. मात्र त्याचा चिंचवडमधील वाहन चालकांना काहीच उपयोग नव्हता. जर या पुलाला जोडणारा रॅम्प तयार केला तर याचा फायदा चिंचवडमधील नागरिकांना होऊ शकतो. तसेच चिंचवडगाव ते चिंचवड स्टेशन आणि पिंपरी चिंचवड लिंक रस्त्यावरीलही वाहतुकीचा ताण कमी होऊ शकतो. त्यामुळे या पुलावर जाण्यासाठी रॅम्प तयार करण्यात आला आहे.
> - राजेंद्र गावडे, माजी नगरसेवक

# पिंपरी-चिंचवड शहर पोलिस आयुक्तालयासाठी 15 एकर भूसंपादनाचा शासननिर्णय निर्गमित....

## वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांसाठी वाकड येथे 15 एकर जागेच्या भूसंपादनास राज्यशासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत पोलिस उप-आयुक्त, परिमंडळ 2 सह, इतर अनुषंगिक कार्यालये तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांसाठी वाकड येथे 15 एकर जागेच्या भूसंपादनास राज्यशासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत पोलिस उप-आयुक्त, परिमंडळ 2 सह, इतर अनुषंगिक कार्यालये तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांसाठी वाकड येथे 15 एकर जागेच्या भूसंपादनास राज्यशासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारामुळे अल्पावधीतंच हा प्रश्न मार्गी लागला असून त्यासंबंधीचा शासननिर्णय आज निर्गमित झाला.




या निर्णयामुळे शहरातील कायदा-सुव्यवस्था सुधारण्याबरोबरंच पोलिस यंत्रणेवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढते औद्योगिकीकरण, देशभरातील स्थलांतरितांमुळे वाढणारी लोकसंख्या, त्यामुळे पोलिस यंत्रणेवर वाढणारा ताण लक्षात घेऊन पोलिस दलाचे सक्षमीकरण आवश्यक होते. त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जातीने लक्ष घालून पोलिस दलाच्या मजबुतीकरणासाठी अनेक निर्णय घेतले. त्याअंतर्गत पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या क्षेत्रातील पोलिस उप-आयुक्त, परिमंडळ 2 सह, इतर अनुषंगिक कार्यालये तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवासस्थानांसाठी वाकड येथे 15 एकर जागेच्या भूसंपादनाचा प्रस्ताव पुढे आला. त्या प्रस्तावास राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता आज मिळाली आणि त्यासंबंधीचा शासननिर्णय निर्गमित झाला. यातून पोलिसदलाला अनेक सुविधा मिळणार असून पोलिस दलाच्या सक्षमीकरणास मदत होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात दर्जेदार पायाभूत सुविधांची निर्मिती करुन शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार गेल्या अनेक दशकांपासून सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून पिंपरी-चिंचवडला आजचे विकसित शहराचे स्वरुप प्राप्त झाले आहे. शहराच्या विकासासबरोबरंच शहरातील कायदा-सुव्यवस्था भक्कम करण्यासाठी पोलिस आयुक्तालयाच्या बळकटीकरणाचा निर्णय त्यांनी घेतला. त्यासंदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण होण्यासाठी जातीने लक्ष घातले. त्यासाठी मंत्रालयात बैठका घेतल्या. त्यांच्या मार्गदर्शनानुसार पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने पीएमआरडीएकडे (पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण) वाकड येथे जागा मिळवण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार, वाकड येथील सर्व्हे नं. 208 आणि 209 मधील 15 एकर जागा, वाणिज्यिक दराने अधिमुल्य रकमेचा भरणा करुन पोलिस विभागासाठी भूसंपादन करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवड पोलिस दलासाठी आवश्यक सुविधा निर्माण होतील. पोलिसांची कार्यक्षमता वाढेल आणि गुन्हेगारी नियंत्रणास मदत होईल. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसाठी उत्तम निवासव्यवस्था उपलब्ध होईल. शहराच्या वाढत्या लोकसंख्येसोबत कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.


# राज्यसेवा परीक्षा वर्णनात्मक स्वरुपातच

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण, भविष्यात एमपीएससीद्वारे मोठी भरती, कुठलाही विरोध ग्राह्य धरणार नसल्याचा दिला इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) घेण्यात येणाऱ्या राज्य सेवा २०२५ या परीक्षेची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही परीक्षा आता वर्णनात्मक स्वरुपात घेण्यात येणार आहे. मात्र या स्वरुपाला विद्यार्थ्यांकडून विरोध केला जात होता. एमएससीच्या एकूण कारभाराबाबत राज्य विधीमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्याला उत्तर देताना ही परीक्षा वर्णनात्मक स्वरुपातच होणार असून कुठलाही विरोध ग्राह्य धरणार नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. १९) स्पष्ट केले.

आमदार विक्रम काळे यांनी एमपीएससीमध्ये मनुष्यबळ कमी असल्याने स्पर्धा परीक्षेची सर्व प्रकिया होऊनही उमेदवारांचे पोस्टिंग होत नाही. असा प्रश्न उपस्थित केला. तसेच पोस्टिंग देण्यासाठी काही व्यवहार होतात, असा आरोप केला. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्णनात्मक परीक्षा होणार असल्याचे स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांच्या या स्पष्टीकरणामुळे आता या परीक्षेच्या वाटेतील सर्व अडथळे दूर झाले असून विद्यार्थ्यांच्या जीवात जीव आला आहे. तसेच भविष्यात एमपीएससीकडून मोठी भरती केली जाणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.



### अजित पवारांनी दिले होते मुख्यमंत्र्यांना पत्र

» राज्यात 'एमपीएससी'द्वारे उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, पोलीस निरिक्षक, प्राध्यापक अशा राज्यसेवेतील महत्वाच्या पदांवरील नियुक्त्या करण्यात येतात. त्यासाठी 'एमपीएससी'मध्ये एक अध्यक्ष आणि पाच सदस्यांची पदे मंजूर आहेत. मंजूर पाच पदांपैकी अध्यक्ष आणि दोन सदस्यांची पदे भरलेली आहेत, तर सदस्यांची तीन पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांमुळे आयोगाच्या कामकाजावर विपरित परिणाम होत असून परीक्षांना विलंब होत आहे. मुलाखती, निकालाची प्रक्रिया रखडत आहे. त्यामुळे ही पदे तातडीने भरावीत अशी मागणी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि विविध संघटनांकडून निवेदनांद्वारे केली जात आहे. या मागण्यांची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले होते.'एमपीएससी'तील तीन सदस्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत, अशी विनंती यात केली होती.

यूपीएससीच्या धर्तीवर राज्यातील उपजिल्हाधिकारी, तहसीलदार ते तत्सम पदांच्या भरतीसाठी एमपीएससी भरतीप्रक्रिया राबविण्यात येते. मात्र, एमपीएससीच्या विरोधात सातत्याने विद्यार्थ्यांमध्ये रोष पाहायला मिळतो. एमपीएससीची दिरंगाई आणि अधिकाऱ्यांमध्ये ताळमेळ नसल्याने विद्यार्थ्यांना आंदोलनासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ येते. तर परीक्षांनंतर निकाल आणि नियुक्तीलाही एमपीएसीकडून तत्परता दिसून येत नसल्याचा आरोप होत असतो. या पार्श्वभूमीवर आमदार शिवाजीराव गर्जेकडून विधिमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्या प्रश्नाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिले.

भविष्यात एमपीएससीमार्फत मोठी भरती करण्यात येणार असून यूपीएससीप्रमाणे एमपीएससीमध्येदेखील वेळापत्रक पाळले जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केल्याने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. "यूपीएससी प्रमाणे एमपीएससीमध्येदेखील कॅलेंडर (वेळापत्रक) असावे, असा आपला प्रयत्न असणार आहे. तसेच, एमपीएससी परीक्षा या वर्षापासून आपण डिस्क्रीप्टिव्ह स्वरुपात घेणार आहोत. अर्थातच, या प्रक्रियेला काहींचा विरोध आहे, मात्र आपण हा विरोध ग्राह्य धरणार नाही," या शब्दात फडणवीस यांनी भूमिका स्पष्ट केली.

### मराठीच होणार परीक्षा

» राज्यातील अभियांत्रिकी आणि कृषी विषयक तांत्रिक पदांच्या परीक्षा मराठीमध्ये घेतल्या जात नसल्याचे सांगत अभियांत्रिकी विषयांची पुस्तके मराठीमध्ये उपलब्ध नसल्याने या परीक्षा इंग्रजी भाषेत घेतल्या जातात. पण आता लोकसेवा आयोगातील अभियांत्रिकी पदांसाठी होणाऱ्या परीक्षा मराठीत होणार आहेत. अभियांत्रिकी पदांच्या अभ्यासक्रमांची पुस्तकेही मराठीत उपलब्ध होणार असून इतर सर्व तांत्रिक पदांच्या स्पर्धा परीक्षा ही मराठीमध्ये घेण्याचे नियोजन असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

### एमपीएससीतील पदे भरणार

» एमपीएससीत ज्या रिकाम्या जागा आहेत, त्यापैकी एक जागा पूर्ण करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तर, उर्वरीत दोन जागांसंदर्भात जाहिरात दिली जाणार आहे. असेही फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान,अजित पवारांनी दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्र्यांना ह्या जागा भरण्यासंदर्भात पत्र दिले होते.

# शिवनेरी, लेण्याद्रीसह चार रोपवे प्रकल्पांना चालना मिळणार

## शिवनेरी, लेण्याद्रीसह चार रोप वे प्रकल्पांना जागा उपलब्धता, आर्थिक सहभाग यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघातील पर्वतमाला योजनेअंतर्गत शिवनेरी, लेण्याद्रीसह चार रोप वे प्रकल्पांना जागा उपलब्धता, आर्थिक सहभाग यासाठी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामुळे गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी असलेल्या रोपवे प्रकल्पांना चालना मिळणार आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघातील पर्यटनाला चालना मिळावी यासाठी शिवनेरी, लेण्याद्री, भीमाशंकर आदी ठिकाणी रोपवे उभारण्याची मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. त्यावेळी केंद्रीयमंत्री गडकरी यांनी राज्य शासनाकडून प्रस्ताव आल्यास 'पर्वतमाला योजनेंतर्गत' रोपवे बांधण्यासाठी निधी मंजूर करण्याचे मान्य केले होते.त्यानंतर खासदार डॉ. कोल्हे यांनी शिरूर लोकसभा मतदारसंघातील शिवनेरीसह विविध रोपवेचे प्रस्ताव केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाकडे पाठवण्याबाबत राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.



त्यानुसार राज्य शासनाने परिशिष्ट -अ नुसार पुणे जिल्ह्यातील श्री निमगाव खंडोबा, सिंहगड व जेजुरीसह एकूण १६ आणि परिशिष्ट-ब नुसार शिवनेरी किल्ला, अष्टविनायक लेण्याद्री,भीमाशंकर ज्योतिर्लिंग व दाऱ्याघाट यासह एकूण २९ ठिकाणी रोपवे बांधण्याचा प्रस्ताव केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाकडे पाठविला होता.राज्यातील विविध ठिकाणी रोपवे बांधण्यासाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय राजमार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लिमिटेड (NHLML) आणि राज्य सरकार यांच्यात ३ फेब्रुवारी २०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला होता.या करारानुसार राज्य सरकारने रोपवे बांधण्यासाठी जागा उपलब्धता,आर्थिक सहभाग देणे आवश्यक होते.

त्याअनुषंगाने राज्य मंत्रिमंडळाने पर्वतमाला योजनेंतर्गत शिवनेरी,लेण्याद्रीसह शिरूर लोकसभा मतदारसंघातील ४ रोपवे प्रकल्पांना जागा उपलब्धता,आर्थिक सहभागासाठी मान्यता दिली आहे.त्यामुळे शिवनेरी,लेण्याद्रीसह राज्यातील सर्वच रोपवे बांधण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे.या संदर्भात खासदार डॉ. कोल्हे म्हणाले की,शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवनेरी, लेण्याद्री, भीमाशंकर, दाऱ्याघाटसह अनेक पर्यटनस्थळं आहेत. या पर्यटनस्थळांचा विकास झाला तर पर्यटनाला मोठी चालना मिळेल आणि त्यातून तरुणांना रोजगार मिळेल.

रोपवे प्रकल्पांबरोबरच राज्य शासनाने शिवनेरी, अष्टविनायक गणपती देवस्थान, वढु-तुळापूरचे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक यांना जोडणारा 'शिव-शंभू कॉरिडॉर' रस्ते प्रकल्पही हाती घ्यावा यासाठी माझा पाठपुरावा सुरू आहे. राज्य सरकारने रोपवे प्रकल्पाला गती देतानाच 'शिव-शंभू कॉरिडॉर'लाही मंजुरी द्यावी, अशी मागणी खासदार डॉ.कोल्हे यांनी केली.

### जनतेच्यावतीने आभार व्यक्त

» या भागाच्या अर्थकारणाला गती मिळावी यासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघातील शिवनेरी, लेण्याद्रीसह विविध ठिकाणी रोपवे उभारण्याची मागणी सातत्याने करीत होतो. या मागणीला केंद्रीयमंत्री गडकरी आणि राज्य सरकारने दिलेल्या प्रतिसादाबद्दल येथील जनतेच्यावतीने आभार व्यक्त केले.